# असंही होऊ शकतं?

श्रीरंग हिर्लेकर, अमरावती.
मो. ९४२२९११८९३

मी आज तुम्हाला अशा एका आपल्या बहिणीची ओळख करून देणार आहे की, तिच्याविषयी वाचल्यावर तुमच्या मनात अगदी सहज प्रश्न निर्माण होईल असंही होऊ शकतं? ही महिला म्हणजे सौ. छाया रघुनंदन भट. ही महिला आपल्या अमरावतीचीची. कदाचित यांचे कर्तृत्व कित्येक जणांपर्यंत पोहोचलेही असेल परंतु ज्यांच्यापर्यंत पोहोचले नाही त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी, त्यांना धैर्य व बळ देण्यासाठी हा माझा प्रयत्न.

छाया भट ह्या फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया येथे कार्यरत आहेत आणि विशेष म्हणजे त्या एक उत्कृष्ट खेळाडू आहेत. त्यांनी विविध प्रकारच्या स्पर्धांमध्ये भाग घेऊन अनेक प्रकारची मेडल्स जिंकली आहेत. त्या मूळच्या भोपाळच्या. त्या काळी मुलींनी खेळात भाग घेऊन पुढे येणे वगैरे समाजमान्यच नव्हते. पण आपल्या मुलीवर अशी वेळ येऊ नये. तिला सर्व काही करता यावे यासाठी त्यांच्या आईने पूर्ण काळजी घेतली. लग्नानंतर त्या आपल्या सासरी म्हणजे भटांकडे आल्या आणि त्यांना अगदी पोषक वातावरण मिळाले. घरातून प्रेरणा व प्रोत्साहनच सतत मिळत गेले. त्यांना विक्रमादित्य पुरस्कार, सर्वोत्कृष्ट खेळाडू, विद्यापीठाचे सतत ३ वर्षे, प्रतिनिधित्व विद्यापीठाच्या प्रमुख, उत्कृष्ट विद्यार्थी अॅवॉर्ड, २६ पेक्षा जास्त नॅशनल स्पर्धा त्या १९८५ ते १९९५ या काळात खेळल्या व अधिकाधिक पदके प्राप्त केली.

एवढी कारकीर्द पार पडल्यानंतर त्या पॉवरलिफ्टिंग या खेळाकडे वळाल्या. त्यातही त्यांनी आपला ठसा उमटवला. प्रथमच त्यांनी एशियन पॉवरलिफ्टिंग १९९३ मध्ये सहभागी होऊन (चायनीज तैपेई) ४ रौप्य पदके प्राप्त केली केली. खरे तर पॉवरलिफ्टिंग म्हणजे मर्दानी खेळ म्हणून ओळखला जातो. पण त्यातही त्यांनी माघार न घेता कठोर परिश्रम, जिद्द आणि थोरांचे आशीर्वाद ठेवून आपला प्रवास सुरूच ठेवला.

छायाताईंचा इतका यशस्वी प्रवास सुरू असताना त्यांना अचानक एका दुर्धर आजाराला सामोरे जावे लागले. तो आजार म्हणजे कर्करोग. त्यांना आतड्यांचा कर्करोग जडला होता आणि



तोही तिसऱ्या पायरीवरचा. हे जेव्हा प्रथमच छायाताईना कळले, तेव्हा त्यांच्या डोक्यात एकच विचार शिरला का जगायचे? मात्र त्यांच्या मुलांचे चेहरे त्यांच्या डोळ्यांपुढे आले आणि त्यांनी ठरवले की, पुढचा प्रत्येक दिवस मी चांगलाच जगणार आणि मीच माझ्या शरीराला आदेश देईन, 'मी उत्तम आहे, मला चांगले जगायचे आहे.' डॉक्टरांनी त्यांना फक्त पाच वर्षे दिली होती पण त्यांनी अगदी स्पष्ट स्वतःशी ठरविले मी माझा येणारा प्रत्येक दिवस चांगला घालविणार.

डॉक्टरांनी त्यांना सांगितले, आता खेळाचा सराव बंद, तुमचे आयुष्य आमच्यासाठी जास्त महत्त्वाचे आहे. बाकी इतर नातेवाइकांनीसुद्धा त्यांना खेळाला विरोधच केला. पण घरच्यांनी मात्र त्यांना सांभाळूनच घेतले, समजावून घेतले आणि त्यांच्या मनाप्रमाणे त्यांना उर्वरित आयुष्य जगू द्यावे, असा निर्णय घेतला. मग पुन्हा त्यांचा सराव सुरू झाला

त्याच्या इयत्ता ४ थी व ६वीत असणाऱ्या मुलांनीसुद्धा 'आई, तू आजारी आहेस' असे कधीही जाणवू दिले नाही. आणि त्या स्वतःपण आपल्या शरीराला सतत आदेश देत असत कीं मला काहीही झालेले नाही. मी एकदम फिट आहे. त्यांना २०१२ मध्ये कॅन्सर असल्याचे कळले, त्या २०१४ मध्ये त्यातून बाहेर पडल्या व आपल्या प्रवासाला त्यांनी पुन्हा सुरुवात केली. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आपली काळजी घेत गेल्या आणि २०१४ ते २०१७ या काळात त्यांनी अनेक पदके राष्ट्रीय स्तरावर प्राप्त केली. सन २०१८ मध्ये त्यांनी नॅशनल बेंच प्रेस पॉवर लिफ्टिंग चॅम्पियनशिप रांची येथे झालेल्या स्पर्धेत भारतासाठी ब्राँझ मेडल मिळविले हे मेडल मिळविल्यानंतर त्यांना जो आनंद मिळाला तो म्हणजे- आपण जीवन जगलो, हरलो नाही. त्यांना स्वतःचाच अभिमान वाटायला लागला. त्यांनी यापूर्वीही अनेक राष्ट्रीय-आंतराष्ट्रीय स्तरावरील पदके मिळवली होती.

पण कॅन्सरवर मात करून घेतलेल्या पदकाचा आनंदच काही वेगळा!

त्या सर्व कर्करोगरुग्णांना सांगतात. घाबरून जायचे नाही, आपल्या आजाराचा बाऊ करायचा नाही आणि आपणच स्वतःला सतत सांगत राहायचे, मी एकदम तंदुरुस्त आहे. मला काहीही झालेले नाही. तेव्हा तुम्ही नक्कीच जिंकू शकता. छायाताई तुम्ही सर्वांसाठी प्रेरणा आहात. तुम्ही सर्वांसाठी आदर्श आहात. सलाम तुमच्या या कर्तृत्वाला. ही हिरकणी आपल्या अमरावतीची, म्हणून आम्हा सर्व अमरावतीकरांना तिचा अभिमान.